॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

**ऑक्टोबर २०२३**


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org










## आशियाई स्पर्धेत भारताला पदक मिळवून देणाऱ्या रणरागिणींना सलाम










# पाकोळी बालवाडी

सर्व गटात नियोजनाप्रमाणे अभ्यासाचे पाठ चालू आहेत. त्याचबरोबर झालेले काही विशेष उपक्रम –

◆ **दहीहंडी –** 'हाथी घोडा पालखी, जय कन्हैयालाल की' अशा घोषणा देत वर्धिनीच्या परिसरात मुलांची प्रभात फेरी झाली. या फेरीतून पालकांनी, डेअरीतल्या काकांनी, किराणामालाच्या दुकानातून काल्यासाठी लाह्या, पोहे, दही दिले. शिक्षकांनी ओंकार सभागृहात दहीहंडी सजवून बांधली. छोट्या गटातील कन्हैयाने ताईंच्या मदतीने दहीहंडी फोडली. मोठ्या गटातील मुला-मुलींनी 'हरी सुंदर हरी नारायण हरी बोला' या गाण्यावर नृत्य केले.

◆ **बैल पोळा –** हा सण शहरात साजरा होताना दिसत नाही. त्याची माहिती ताईंनी मुलांना सांगितली. फळ्यावर बैलपोळ्याचे छान चित्र काढले व खेळण्यातील छोट्या बैलांची पूजा मुलांनी केली.





◆ **स्थळ भेट –** शेवटच्या श्रावणी सोमवारी दि. ११ सप्टेंबरला जंगली महाराज रस्त्यावरील पाताळेश्वर मंदिरात मोठ्या गटातील मुले व पालक यांची स्थळ भेट झाली. पुष्पाताईंनी या मंदिराचा इतिहास व लेण्यांची माहिती सांगितली. देवळात मुलांनी श्लोक व शंकराची गाणी म्हटली.

◆ **गणेशोत्सव –** मोठ्या गटातील मुलांनी श्रावण महिन्यापासून रोज अथर्वशीर्ष पठणाची तयारी करून उत्सवात कसबा गणपती, त्वष्टा कासार गणपती या व परिसरातील इतर मंडळांपुढे, एकूण ९ ठिकाणी अथर्वशीर्ष पठण केले. मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी शाळेच्या शिक्षिका सौ. मनीषाताई जाधव व सौ. अश्विनीताई महाडिक यांच्या घरी जाऊन गौरींचे दर्शन घेतले. केलेल्या सजावटीची व गौरी सणाची माहिती ताईंनी सांगितली.

◆ **शिक्षक दिन –** मोठ्या गटातील मुलांनी मधल्या व लहान गटात शिक्षक म्हणून जाऊन बडबड गीत, अभिनय गीत सादर करून मुलांकडून म्हणून घेतले.














# महिला विभाग

◆ **शिवण वर्ग –** महिलांना व्यवसाय पूरक वेगळी संधी उपलब्ध व्हावी या हेतूने शिवण वर्गातील विद्यार्थिनी, शिक्षिका व वर्धिनीतील कार्यकर्ते यांनी नानावटी मणीलाल व्होकेशनल इन्स्टिट्यूट, महर्षी कर्वे शिक्षण संस्था, कर्वेनगर येथील फॅशन डिझायनिंग वर्गास भेट दिली. तिथे चालणारे शिवण विषयातील वेगवेगळे उपक्रम बघितले. यातून सर्वानुमते 'बॅग मेकिंग' हा वर्ग सुरू करावा असे ठरले. दि. ७ ऑगस्ट पासून एक महिन्याचा वर्ग सुरू झाला. संस्थेच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई सुपेकर यांनी वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात सर्वांना मार्गदर्शन केले. श्रीमती छायाताई वरगणे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ मुलींचा वर्ग झाला. सर्वांनी उत्साहाने वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या शिवल्या. यातून काही जणींचा व्यवसायही सुरू झाला आहे. दि. २५ सप्टेंबरला कर्वे संस्थेचे अध्यक्ष श्री. रवी देव सर यांच्या हस्ते मुलींना प्रशस्तीपत्रक मिळाले. सरांनी मार्गदर्शन करताना

'मिळालेल्या प्रत्येक संधीचा सोन्यासारखा उपयोग करून घ्या. आपल्यातील कलागुणांना वाव द्या' असे सांगितले. मुलींनी आपल्या मनोगतात 'अशा प्रकारच्या वेगवेगळ्या वर्गात आम्ही निश्चित सहभागी होऊ आणि नवीन नवीन शिकत राहू' असा विश्वास दर्शवला.









# स्पर्धा परीक्षा केंद्र आणि अभ्यासिका

२०१३ पासून गणेशोत्सवाला विभागाने सुरुवात केली. २०१४ पासून 'श्रमिकांचा बाप्पा' हा उपक्रम जे समाजातील घटक वेगवेगळ्या प्रकारचे काम करीत असतात, पण त्यांच्या कार्याला प्रतिष्ठा लाभत नाही. श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी आयोजित होतो. श्रमिक घटकांमध्ये स्वच्छता कर्मचारी, रिक्षा चालक, चहावाले काका, साफसफाई करणारे कर्मचारी इ. यांना बोलावून त्यांच्या हस्ते 'श्रीं'च्या आरतीचा मान दिला जातो. आरतीबरोबर ते आपले मनोगत व्यक्त करतात.

दि. १९ सप्टेंबर २०२३ सकाळी ११ वाजता 'श्री'ची प्रतिष्ठापना तृतीयपंथी समाजसेविका अमित मोहिते उर्फ आम्रपाली यांच्या हस्ते करण्यात आली. आम्रपाली 'सावली सोशल फौंडेशन'च्या संस्थापक अध्यक्ष आहेत. तृतीयपंथींच्या न्याय हक्कासाठी काम करताना त्यांनी पुणे शहरात सहा ठिकाणी गरीब मुलांसाठी 'फुटपाथ शाळा' सुरु केल्या. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी १४५ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उभा केला, तसेच त्यांनी १९२ लोकांना छोटे व्यवसाय सुरु करून दिले आहेत. आपले मनोगत व्यक्त करतांना त्यांनी तृतीयपंथींविषयी समाजात कशा प्रकारे गैरसमज आहेत याविषयी वेगवेगळ्या उदाहरणांमधून माहिती दिली. त्या म्हणाल्या, 'आम्हाला दया नको, समान वागणूक हवी, तृतीयपंथींना सहानुभुती नव्हे तर समान वागणुकीची गरज आहे. तेही आपल्या समाजातील एक घटक आहेत हे मान्य करून त्यांना आपलेपणाने स्वीकारावे. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.' संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय तांबट, ज्येष्ठ कार्यकर्त्या पुष्पाताई नडे यांनी आम्रपाली मोहितेंचा भारतीय संविधानाचा सरनामा देऊन सन्मान केला.

दररोज आरती ही श्रमिक घटकातील मान्यवरांकडून, चहाचा व्यवसाय करणारे श्री. सुदामा वाघेले व श्री. सुनिल भंडाळे, मेस चालवणाऱ्या श्रीमती शोभा कोराळे, व्यायामशाळा प्रशिक्षक व वर्धिनीचे वर्धक आयुब शेख, सुरक्षारक्षक उमर शेख, सचिन पवार, केदार ब्राह्मणे व लक्ष्मण काशीद, स्वच्छता कर्मचारी श्री. मुकुंद लोणारी यांच्या हस्ते झाली.

श्री. उमर शेख हे सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करता करता त्यांची नुकतीच मुंबई पोलीस म्हणून निवड झाली आहे. आपले

मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले, 'अभ्यास कसा केला पाहिजे, स्वतःवर विश्वास ठेवून. शांतचित्ताने परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. यामुळे आपल्याला निश्चितच यश मिळते.'







# समुपदेशन विभाग

नियोजित उद्दिष्टांप्रमाणे वेगवेगळे उपक्रम झाले.

◆ **एकात्मिक स्वयं विकास सत्र -** वर्धिनीच्या १२ शाखांमधील एकूण ३१३ विद्यार्थ्यांसाठी पुढील विषयांवर सत्रे घेण्यात आली. - १) अभ्यास कौशल्य २) अभ्यासाचे व्यवस्थापन व कार्यवाही ३) वेळेचे व्यवस्थापन ४) ध्येय आणि गुणांची निश्चिती ५) दिनचर्येचे वेळापत्रक निश्चित करणे ६) स्व-विश्लेषण ७) चांगल्या वाईट सवयी.

◆ **प्रभावी पालकत्व -** पालकांचा त्यांच्या मुलांशी संवाद वाढावा, संबंध दृढ व्हावेत अशा प्रभावी पालकत्वाच्या हेतूने सत्रांचे आयोजन झाले. ४० पालकांनी याचा लाभ घेतला.

◆ **बुद्धिमापन चाचणी -** सर्व शाखांमध्ये नवीन प्रवेशासाठी १६४ मुलांची निवड चाचणी अंतर्गत बुद्धिमापन चाचणी (IQ test) झाली.

◆ **शाळांमधील संपर्क -** 'किशोरवयीन मुलांमधील समस्या' या विषयावर कन्या शाळा, भवानी पेठ (सहभागी मुली - १५१) तर हुजूरपागा प्रशालेत 'कळी उमलताना' या विषयावर व्याख्यान झाले. (सहभागी मुली - ४००)











# अभिनंदन

◆ पाकोळी बालवाडीच्या मुख्याध्यापिका **सौ. राणी काळे** यांचा आदर्श शिक्षिका म्हणून कसबा संस्कार केंद्राकडून शिक्षकदिनी सत्कार झाला.

◆ स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी **श्री. मनोज देसले** यांची औषध निर्माण अधिकारी म्हणून वैद्यकीय आणि संशोधन संचालनालयामधून तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधून **पूजा कुऱ्हाडे, समीक्षा अत्रे, देवानंद काळे** यांची करसाहाय्यक पदी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून **जान्हवी जानकर** यांची अधिक्षक पदावर निवड झाली.

◆ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर (अकॅडेमिक कौन्सिल) नामनिर्देशित सदस्य म्हणून मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी वर्धिनीचे कार्याध्यक्ष **डॉ. संजय तांबट** यांची निवड केली आहे.

◆ वर्धिनीचा युवा कार्यकर्ता **रवी महतो** याला आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत – १० km क्रॉस कंट्री, यात तिसरा क्रमांक मिळाला. **श्रेयस खंडाळे** यास पुणे जिल्हा जुनिअर अथलेटिक चॅम्पियनशिप स्पर्धेत ३००० मीटर स्टीपल चेस स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला. पुणे जिल्हा क्रीडा परिषद व पुणे महानगरपालिका आयोजित शालेय 'कुस्ती स्पर्धा' ग्रीको रोमन स्टाईल या खेळामध्ये १९ वर्षाखालील वयोगटात राजर्षी शाहू शाखेतील युवक **विपुल आंबेकर** याने प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) व **अक्षय औजी** याने द्वितीय क्रमांक (सिल्व्हर मेडल) पटकावला आहे व त्यांची 'पुणे विभागीय स्पर्धेसाठी' निवड झाली.

**सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन !!!**

# उत्थान विभाग

◆ **मासिक प्रशिक्षण –** दि. ३ सप्टेंबरला सर्व अभ्यासिका प्रमुखांचा (संख्या – २०) प्रशिक्षण वर्ग झाला. मुलांना हसत खेळत शिक्षण देणे याविषयी गटचर्चा झाली. मराठी व इंग्रजी विषयांचे प्रशिक्षण उमेश माळेकर यांनी, गणित विषयाचे प्रशिक्षण श्रीमती मानसी खंडाळे व करिअर मार्गदर्शन श्रीमती अंजलीताई लेले यांनी केले.

◆ **अभ्यासिका उद्घाटन –** दि. ५ सप्टेंबर पासून भिमाले संकुल, पिंपळ मळा, भवानी पेठ येथे 'मणिकर्णिका' अभ्यासिका सुरू झाली. उद्घाटन कार्यक्रमास १९ मुले व १४ पालक उपस्थित होते. अभ्यासिकेतील उपक्रमांची माहिती विभाग प्रमुख श्री. उमेश माळेकर यांनी सांगितली.

◆ **विशेष व्याख्यान –** 'गोष्ट इथे संपत नाही' या अंतर्गत दि. १० सप्टेंबरला स. प. महाविद्यालयामध्ये श्री. सारंग मांडके व श्री. सारंग भोईरकर यांचे शिवचरित्र व्याख्यान झाले. सिंहगडाची मोहीम, साल्हेरची लढाई, सुरतेची मोहीम, प्रतापराव गुर्जर यांचे बलिदान, या शिवचरित्रातील घटना दोघांच्या प्रभावी मांडणीमुळे प्रेरणादायी झाल्या. सभागृह 'शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणांनी दणाणले. (उपस्थिती – ५५)

◆ **किशोरी विकास एकत्रीकरण –** दि. १० सप्टेंबरला किशोरी गटाचे एकत्रीकरण वर्धिनीच्या ओंकार सभागृहात झाले. या दिवशी मंगळागौरीचे खेळ मुलींना शिकवले. खुर्ची का मिरची, पाणी लाटा, तामतवली, कोंबडा, गाठोडं हे खेळ खेळण्यात मुली रमल्या. या खेळांमधून होणारा व्यायाम खेळताना ताईंनी स्पष्ट केला.

◆ **पालक सभा –** कसबा भागातील प्रियदर्शनी व राजमाता अभ्यासिकांमध्ये पालक सभा झाल्या. पथनाट्य, सहामाही परीक्षा व मुलांमध्ये झालेले बदल या मुद्द्यांवर विभाग प्रमुख उमेश दादाने पालकांशी संवाद साधला.

◆ **गणेशोत्सव –** शिवरायांच्या ३५० व्या राज्याभिषेकानिमित्त, 'सद्य परिस्थितीत शिवराय पुणे भेटीला आल्यावर काय काय पाहतात ?' यावर भाष्य करणारे पथनाट्याचे सादरीकरण एकूण ७ अभ्यासिकांतील वर्धक-वर्धिकांनी गणेश मंडळांपुढे सादर केले. यातून मुलांचा आत्मविश्वास वाढला व वर्धिनीचे काम अनेक लोकांपर्यंत पोहोचले.














## श्रद्धांजली

- भारतातील हरितक्रांतीचे जनक, प्रसिद्ध कृषी शास्त्रज्ञ **डॉ. एम. एस. स्वामीनाथन** यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.
- वर्धिनीचा युवा कार्यकर्ता राजेश बोरुडे यांच्या वडिलांचे **श्री. बबन बाबू बोरुडे** यांचे निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.**